# महाभारत

## खंड आठवा : सभापर्व भाग तिसरा

अशोक कोठारे

ई साहित्य प्रतिष्ठान

# महाभारत

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न के यास कायदेशीर कारवाय होऊ शकते .

ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० सप्टेंबर २०१८**

## – अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याचवेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना मुद्दाम प्राचीन (Archaic) भाषा वापरतात परंतु माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत पंचवीस खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा

आहे. त्यात मूळ महाभारताचे खंड केले आहेत, त्यातील हा आठवा खंड आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, अशोक सम्राटाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे

माझा ई–मेल – ashokkothare@gmail.com

ह्या वरुन आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

माझे विचार व संशोधन कांहीं ब्लॉग मधून प्रसिद्ध करत असतो ते असें –

You are invited to visit my other blogs

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/

for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

You may visit blog, Ideas and tips on any subject,

http://kotharay.blogspot.in/

for intelligent discussions.

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते
Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/



# – महाभारत सभा पर्व खंड तिसरा –

## सभा पर्व भाग चौर्याहत्तरावा

(अनुद्युत पर्व सुरु)

राजा जनमेजय विचारतो, मला सांगा ऋषीवर्य, जेव्हां पांडव त्यांची सगळी संपत्ति व इतर वैभवाच्या गोष्टी घेऊन हस्तिनापुर सोडून गेले ते समजल्यावर दुर्योधन आणि त्याचे दोस्त मंडळी ह्यांची कोणती प्रतिक्रिया झाली.

वैशंपायन सांगू लागतात, अरे राजा, जसें कौरवांच्या प्रमुखांना समजते किं, पांडव त्यांच्या पित्याच्या परवानगीने वैध मार्गानें आपली सगळी संपत्ति, दागिने, जडजवाहर, सोनेचांदी असें सगळे घेऊन गेले तेव्हां, दुःशासन वेळ न दवडता आपल्या मोठ्या भावास सल्ला मसलत करण्यासाठी भेटतो. तो दुर्योधन त्यामुळें अति दुःखी झालेला त्याला बोलतो, "अहो महाबली योद्ध्यानो, जे आपण एवढी बदमाषगिरी करून खटाटोप करून मिळवले ते सगळे त्या म्हातार्याने सहजपणे फुंकून दिले आहे. तुम्हाला माहीत आहे कां, त्यांने पै न पै त्यांना देऊन टाकली आहे, आता आपल्याकडे पुन्हा कांहींच उरलेले नाही". भरपूर कांहीं मिळाले आहे अशा खोट्या भ्रमात असलेले ते त्यांचे दोस्त, जसें कर्ण, शकुनी पुन्हा विचारात पडतात. ते ठरवतात किं, आता कांहीं असा डाव टाकावा लागेल कीं, तो त्या पांडवांना पुनः फसवू शकेल. तो ठरवून दुर्योधन आपल्या बापाकडे जातो व खोटे मोठेपणाचे सोंग घेऊन त्यांच्याशी बोलतो, "अहो तात आपल्याला माहीत आहे कां, ज्ञानी बृहस्पति शक्रला काय सल्ला देतात जेव्हां तो स्वर्गीय देव त्यांच्याकडे शत्रूशी कसे वागावे ह्याबद्दल मार्गदर्शन विचारतो? ते सांगतात, अरे वैर्यांचा नाश करणार्या इंद्रा, ऐक, जे वैरी, विविध डावपेंच आखून मारा करतात त्यांना माफ करावयाचे नसते. त्यांना ठार मारावयाचे असते. असें असूनही तुम्ही पांडवांना त्याची संपत्ति विनाशर्त परत केली हे काय केले तुम्ही"? ते अहो महाराजे, धृतराष्ट्र, ते पिसाळलेल्या सापासारखे झाले असतांना तुम्ही त्यांना सगळी संपत्ति, रथ, इतर आयुध असें सगळे घेऊन जाण्यास परवानगी कशी दिली. आता जर तो महाबली त्यांच्या फौजा घेऊन आपल्यावर चाल करून आले तर आपण त्यांच्याशी दोन हात करू शकणार नाही. सापाला मान दाबून पकडल्यानंतर मारूनच

टाकावयाचे असते, असे मोकळे सोडावयाचे नसते. अहो आमचे बाबा, तो अर्जुन त्याचे अनंत भाते घेऊन त्याच्या रथातून आला तर त्याच्याशी आमच्या पैकी कोणीही लढू शकणार नाही. दैवयोगांने त्यांचा मोठा भाऊ जो निकम्मा आहे व स्वतःला मोठा नितीमान समजतो व सुदैवांने ते सगळे चार कर्तृत्वेचे मेरूमणी त्याच्या आज्ञेत रहातात म्हणून आम्ही हे सगळे घडवून आणले पण तुम्ही त्या भिमाच्या ओरडण्याला घाबरून आमच्या भल्यासाठी त्यांना तसेंच मुक्त केले हे आम्हाला समजण्या पलिकडले झाले आहे. युधिष्ठीर मूर्ख आहे व स्वतःला मोठा धर्मी समजतो म्हणून आजवर आपण वाचलो आहोत परंतु, त्यांचा आत्येभाऊ दामोदर ज्याला तो मूर्ख युधिष्ठीर फार मानतो तो मोठा बेरक्या आहे, त्याच्या कडून जर कांहीं सुचना आली तर त्यापुढे युधिष्ठीराचे शहाणपण चालणार नाही व तो कृष्ण आपल्याला धडा शिकवल्या शिवाय रहाणार नाही. तुम्ही पाहिले नाही कसे त्यांने दैवी सामर्थ्याने त्याच्या मानलेल्या बहिणीला, द्रौपदीला एकामागोमाग एक साड्या नेसवल्या. त्या वृकोदराची नुसती आठवण सुद्धा मला धडकी भरवते. तो नकुलसुद्धा त्याची तलवार व ढाल घेऊन आमच्यावर चाल करून आला तर आम्ही काय करणार? तो दुसरा सहदेव आणि स्वतः युधिष्ठीर एकमेकांना कौरवांवर चाल करून येण्याच्या खुणा करत असतील तर आपले कसे होणार? मी अहो राजे तुम्हाला सांगतो, ते आता खांडवप्रस्थाला जाऊन तेथून सैन्याची तयारी करून परस्पर आपल्यावर चाल करून येणार नाहीत असें कसें तुम्ही समजता? ज्या प्रकारे आम्ही त्यांचा उपमर्द केला त्यांच्या बायकोची निर्भत्सना केली ते पहाता हे सगळे होणे क्रमप्राप्त आहे, पण तुम्हाला ते समजणे कसे शक्य आहे कारण तुम्ही अंध अहात व आमची आईसुद्धा मिताक्ष झाली आहे". आता पुनः आम्ही एकदा द्युत खेळून त्यांना जिंकून वनवासात पाठवू इच्छितो. त्या मार्गाने आम्ही त्यांना पुनः आमच्या ताब्यात घेऊ शकतो. कारण जोवर ते त्या मूर्खाला त्यांचा राजा मानतात तोवर हे शक्य आहे. अशारितीने त्यांना हरवून आम्ही त्या पांचही जणांना व त्यांच्या प्रिय पत्नीला बारा वर्षे वनवासात पाठवू असे ठरवत आहोत. आपला मामा तुमचा आवडता साळा, शकुनी त्यात तरबेज आहे त्यामुळें अशा डावात आम्ही निश्चितपणे यशस्वी होऊ ह्याबद्दल खात्री बाळगा. ह्यावेळी मात्र आम्ही कोणतीही अपमान कारक वागणूक त्यांच्या पत्नीला अथवा कोणालीही देणार नाही. म्हणजे नको तो कडवटपणा

निर्माण होणार नाही. बारा वर्ष वनवास व एक वर्ष अज्ञातवास अशी शिक्षा त्यांना देईन तेवढ्या काळात आम्ही त्यांच्याशी लढण्यासाठी तयार होऊ शकू. त्या काळात हे जग त्यांना विसरलेले असेल. सगळे राजे आमच्या बरोबर असतील त्यामुळें त्यांना नष्ट करणे आम्हाला सोपे होईल. जर त्यांनी तरीसुद्धा डोके उचलले तर त्यांना विशेष हालचाल करण्या आधी पटकन मारून टाकू". ते ऐकल्यावर पुत्रप्रेमांने पागल झालेला तो धृतराष्ट्र आज्ञा करतो कीं, जा आणि त्यांना परत द्युत खेळण्यासाठी बोलवा.

ते ऐकल्यावर सगळे वडील धारे एका आवाजात त्याला विरोध करतात. त्यात द्रोण, सोमदत्त, वल्हिक, गौतम ऋषी, विदूर, अश्वत्थामा, धृतराष्ट्राच्या वैश्य पत्नीपासूनचा मुलगा युयुत्सू, त्याची आई भुरीश्रवा, भिष्म असें सगळे होते. त्याशिवाय इतर मित्र राजेसुद्धा ह्या नव्या अरिष्टास विरोध करत असतांना तो अंध राजा हट्टाने पांडवांना पुनः द्युत खेळण्याचे आमंत्रण देतो.

अशारितीने सभापर्वातील अनुद्युत पर्वाचा चौर्याहत्तरावा भाग संपला.

# सभा पर्व भाग पंच्याहत्तरावा

(अनुद्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगत असतात, अरे जनमेजया, त्या प्रसंगी कौरवांची माता गांधारी पुढील धोक्याचा अंदाज आल्यामुळें व त्यातून जे भयंकर घडणार आहे त्याच्या कल्पनेने चिंतीत होऊन तिच्या पतिस, धृतराष्ट्राला बोलते, "आपल्याला आठवते कां, जेव्हां हा दुर्योधन जन्मला तेव्हां, कसा कोल्ह्या सारखा ओरडत होता. ते ऐकून विदूर भाऊजी बोलले होते, हा तुझ्या पोटी जन्मलेला कुरु वंशाचा नाश करणारा असेल तर आत्ताच त्याला पलिकडील विश्वात धाडणे श्रेयस्कर ठरेल. ह्या एका मुलामुळें माझी इतर मुलं सुद्धा नष्ट होतील ते योग्य होईल कां? आता माझ्या मते ह्याचा विचार करण्याची वेळ आली आहे. ह्यावेळी जर त्याच्या मोहा खातर पुन्हा तिच चूक करणार तर तुम्ही स्वताला पुढे माफ करू शकणार नाही. तुमच्या एका चुकीमुळें सगळे क्षत्रिय विनाकारण विध्वंसले जातील हे बरोबर होईल कां? लक्षात घ्या, ते पृथाचे पुत्र सुड घेणारे नाहीत, ते क्षमाशिल आहेत हे तुम्ही जाणता तरी दुर्योधनाच्या काल्पनिक गोष्टींच्या आहारी कसे फसता"? पुढे गांधारी बोलते, "तुमचे अशारितीने पांडवांना पुन्हा द्युत खेळण्यास बोलावणे म्हणजे, पूर्णपणे तयार झालेले धरण तोडण्यासारखे होईल, किंवा विझलेली आग पुन्हा पेटवण्यासारखे होईल. कशाला त्या शातताप्रेमी पंडुच्या मुलांना भडकवता? अहो अजमिदाचे वंशजा, तुम्ही चांगलेच स्मरता हे सगळे, तरी मी तुम्हाला त्या गोष्टींची आठवण करून देत आहे कारण, तुम्ही जाणता, युधिष्ठीर पुन्हा द्युतात हरेल व पुनः गुलाम होईल परंतु, ह्या वेळी इतर पांडव सावध असतील त्यामुळें जो भडका होईल तो त्यांच्या मोठ्या भावाला थांबवता येणार नाही हे लक्षात घ्या आणि हे प्रकरण वाढवू नका. पापबुद्धीचे लोक नितिशास्त्र पाळत नाहीत. त्यांचे नियम वेगळे असतात. पोक्त माणसे पोरकटपणा करत नाहीत. तुमच्या मुलांना तुमचे ऐकण्यास भाग पाडा. त्याउलट तुम्ही त्या दूरदृष्टीहीन दुर्योधनाचे ऐकता, हे योग्य नाही. मुलांचे लाड करण्याची ही पद्धत नाही. जर तसे झाले नाही तर ती मुलं आपल्या समोर मारली जात असल्याचे आपल्याला पहावे लागेल कारण शेवटी क्षत्रियांचे आधिपत्य एक द्युत नाही तर एक युद्धच ठरवत असते. द्युत खेळ म्हणून ठीक आहे पण राजकारणातील डावपेच म्हणून तो वापरला गेला तर त्यातून युद्धाची ठिणगी पडणार हे

निश्चित. म्हणून माझे ऐका, अहो राजन, ह्या पापमय मुलाचा त्याग करा व आपल्या इतर मुलांचे भले करा. जर मी सांगते तसे तुम्ही नाही केले तर कुरुवंशाचा नाश निश्चित होईल व ते तुम्हाला पहावे लागेल कारण, जरी आपली सगळी मुलं मेली तरी आपण जीवंतच असू. अशी घोडचूक करू नका. शांत चित्ताने विवेकांने निर्णय घ्यावा. बहुतांच्या भल्याचा निर्णय घेणे हे चांगल्या राजाचे लक्षण समजले जाते. एकाच्या भ्रष्टबुद्धीसाठी बहुतांचे नुकसान करणे चांगल्या राजाचे लक्षण नाही म्हणून तुम्ही पांडवांना द्युताचे पुनः आमंत्रण देऊ नका. पापमार्गाने मिळालेली संपत्ति लवकर विनाशास आमंत्रण देते कारण तिच्या बरोबर दुर्बुद्धी वाढत असते परंतु, पुण्यमार्गाने मिळालेली संपत्ति चिरकाळ टिकते आणि सावकाशपणे पिढ्यान पिढ्या वाढत जाते जसे पांडवांच्या बाबत आपण पहात आहोत".

आपल्या पत्नीचे ते शहाणपणाचे बोलणे ऐकल्यावर तिचा पति धृतराष्ट्र तिला सांगतो, "जर विनाश होणेच भाकितात असेल तर तो कोणी टाळू शकणार नाही. मी आता माझा निर्णय तुझ्यासाठी बदलू शकत नाही. जे व्हावयाचे ते होऊन जाऊ दे. माझ्या मुलांच्या मर्जीनुसार जे होणार ते होणारच. म्हणून पांडवांना परत बोलवा व जे व्हावयाचे ते होऊन जाऊद्या. त्यांचा द्युताचा खेळ हेऊ द्या.

अशारितीने सभापर्वातील अनुद्युत पर्वाचा पंचाहत्तरावा भाग संपला.

# सभा पर्व भाग श्याहत्तरावा

(अनुद्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगत असतात, कौरवांचा दूत धृतराष्ट्राने पढवल्या प्रमाणे त्याचा निरोप घेऊन इंद्रप्रस्थाकडे जातो. तेथे तो ठरल्यानुसार पांडवांना वाटेतच गाठतो व युधिष्ठीराला भेटतो. त्याला धृतराष्ट्राचा निरोप देतो. त्यात तो त्या मोठ्या पांडवांस सांगतो किं, असा असा संदेश त्यांच्या पितृतुल्य काकांचा आहे. कृपया परत फिरा व पुन्हा द्युताचा खेळ खेळावा असा तो निरोप होता. तो निरोप ऐकल्यावर युधिष्ठीर त्याला सांगतो, "प्राणी त्याला विधात्यांने ठरवलेल्या योजनेनुसार चांगले अथवा वाईट फळ प्राप्त करत असतो. मी तो द्युत खेळो अगर न खेळो जे प्राक्तनांत दिले आहे ते जर होणारच असेल तर त्याला विरोध करण्यात काय अर्थ आहे"? "आता मला पुन्हा तेथून द्युत खेळण्यासाठी बोलावत आहेत! हे आमंत्रण धृतराष्ट्राच्या आधीच्या आदेशा विरुद्ध आहे. तरी मी ते नाकारू शकतो पण नाकारणार नाही".

वैशंपायन पुढे सांगतात, अरे जनमेजया, तुला माहीत आहे किं, प्राणी सोन्याचा कधीही नसतो तरी रामचंद्र एका सोन्याच्या हरणामागे गेला असे सांगतात. त्याला माहीत होते किं असा प्राणी नसतो पण मोह माणसाचा बुद्धीभेद करू शकतो. तसेंच कांहींसे युधिष्ठीराच्या बाबत होत होते. त्याची सद्बुद्धी काम करेनाशी झाली होती असें वाटते. जेव्हां माणसावर गंडांतर येणार असते तेव्हां अशा गोष्टी होत असतात. ज्या साधारण जाणीवा समजू शकत नाहीत. शहाणे समजलेले लोक सुद्धा जेव्हां त्यांचे संकटकाळ सुरु होतात तेव्हां चुकीचे निर्णय घेऊ लागतात जे कोणत्याही विवेकांने स्पष्ट करता येत नाहीत. पांडवानी त्याला त्यांचा नेता म्हणून मान्यता दिली होती, त्यामुळें ते एकमतांने त्याच्या सगळ्या निर्णयांचे बिनशर्त स्वागत करत होते, हे आणखीन एक विलक्षण कृत्य होत होते.

वैशंपायन पुढे सांगतात, सगळे कांही समजून उमजून ते पांडव परतीचा प्रवास सुरु करतात, हस्तिनापुराला जाण्यासाठी. ते पुनः शकुनी बरोबर द्युत खेळणार असतात. ह्यावेळी युधिष्ठीर दैवासाठी म्हणजे जिंकण्याच्या मोहाने नाही तर केवळ विधात्याला काय करावयाचे आहे ते पहाण्यासाठी तेथे जात असतो. त्याला पूर्णतया माहीत असते किं तो पुनः हरणार तरी तो व त्याचे चार प्रामाणिक बधू कौरवांच्या सभेत जात असतात. त्यांना

पहावयाचे असते आता, ते कौरव काय त्यांच्याकडून अपेक्षा करणार आहेत? ते महाबली तेथे परत आल्यामुळें त्यांच्या हितचिंतकांच्या मनात दुःख भाव उत्पन्न होतो. ते द्युतासाठी पटावर जाऊन बसतात. त्यांना माहित असते शकुनीचे फसवे फांसे पुन्हा डाव उलटवणार आहेत तरी ते शांतपणे त्या घडीची वाट पहात असतात.

शकुनी त्यांना बोलतो, म्हातार्याने तुम्हाला तुमची संपत्ति परत केली आहे ते ठीक आहे त्याबद्दल चर्चा होणार नाही. आता एका ह्या डावात काय नियम असेल ते पाहू. एकच डाव खेळला जाईल त्याचे महत्व मोठे असेल. जर तुम्ही हरलात तर चर्म वस्त्र नेसून तुम्ही बारा वर्षासाठी वनवासास जाल. अशा प्रदेशात जाल जेथे आधी कोणी कधी गेलेले नाही. तुमच्या बरोबर तुमची समाईक पत्नी तुम्हाला साथ देऊ शकेल. तेरावे वर्ष अज्ञातवासात काढावे लागेल आणि जर ओळखले गेले तर पुन्हा बारा वर्षे वानवासास जावे लागेल किंवा आम्ही तुम्हाला ठार मारून टाकू. असा नियम ठरवलेला आहे. जर मी हरलो तर ते मला करावे लागेल, असें सांगून तो धूर्त सुवलाचा पुत्र हसत हसत त्याचे बोलणे संपवतो. पुढे तो सुवलाचा मुलगा सांगतो तेरा वर्षानंतर जर तुम्ही सगळे यशस्वीरित्या हे केले तर परत आल्यावर तुमचे राज्य तुम्हाला परत केले जाईल. जर मी म्हणजे कौरव हरले तर त्यांनासुद्धा हा नियम लागू असेल. हे नियम मान्य करून तू खेळावयास तयार हो. हे ऐकून सभेत बसलेले दुर्योधनाचे मित्र त्यांचे हात वर करून ओरडून सांगू लागतात, "अरें कोणी दुर्योधनाला शहाणं करा, हा खेळ इतका सहज संपणारा नाही. त्याला आणि त्या त्याच्या बापाला, धृतराष्ट्राला काय ते करत आहेत त्याचे भान आहे कां? शकुनीवर एवढा विश्वास ठेवणे बरोबर नाही. थोडक्यात कौरवांचे सगळे संपुष्टात येईल जर शकुनीने एक चुक केली. कोणावर एवढा विश्वास ठेवणे मृत्यूला बोलावणे देण्यासारखे आहे".

वैशंवायन पुढे सागतात, राजा युधिष्ठीर ते ऐकून त्यातील संकटाची कल्पना असूनही तेथे पटावर खेळण्यासाठी बसतो. युधिष्ठीर बोलतो, माझ्या सारखा उच्च कुलिन राजा सर्व परिस्थितीची व परिणामांची कल्पना असूनही खेळण्यास आलो आहे. जे होईल ते पाहून घेऊ.

शकुनी त्याला बोलतो, "आधी आपण जनावरं, घोडे, शेळ्या, मेंढ्या पणाला लावत होतो पण ह्यावेळी आम्ही कौरव स्वतःला पणाला लावत आहोत. तुम्हीसुद्धा तसे करावे".

अरे जनमेजया, ते महाबली पांडव तयार होतात व फांसे टाकले जातात. अपेक्षेप्रमाणे युधिष्ठीर डाव हरतो.

अशारितीने सभापर्वातील अनुद्युत पर्वाचा श्याहत्तरावा भाग संपला.

# सभा पर्व  भाग  सत्याहत्तरावा

(अनुद्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, आधीच मनाची तयारी केली असे वाटावे अशा प्रकारे ते पांडव वनवासास जाण्याची तयारी करतात. ते हरल्यावर त्यांचे राजाचे रेशमी वस्त्र काढून हरणाच्या कातड्याचे वस्त्र परिधान करून वनवासात जाण्याच्या तयारीत होतात. ते पाहून दुःशासन उद्गारतो, "आजपासून आमच्या दुर्योधनाची अमर्याद सत्ता सर्वकडे सुरु झाली आहे. हे पहा द्युत हरलेले पंडुपुत्र आपली राजाची वस्त्र टाकून संन्यासाचे कपडे घालून जात आहेत. जे युद्धात कोणालाही हगणार नाहीत असें शूरयोद्धे दैवावर अवलंबून रहाण्याच्या ध्यासापोटी हे दुर्भाग्य स्वीकारत आहेत. आम्ही कौरव कसेही करून आमचे उद्दीष्ट साध्य करत असतो. आज आम्ही सगळ्याच्या पेक्षा श्रेष्ठ ठरलो आहोत, ही बाब कौतुकाचीच आहे नाही कां? आम्ही पृथाच्या मुलांना एका कधीही न संपणार्या अशा अंधारमय जगात फेकले आहे. त्यांचे सगळे सुख, आनंद, चैन आम्ही त्यांच्यापासून कायमची हिरावून घेतली आहे. त्यांचे सगळे वैभव आता आमचे झाले आहे. त्यांचे ते स्वर्गीय झगे, आरामदायी झोपण्याचे कक्ष, असे सगळे आम्ही एका डावाने त्याच्याकडून काढून घेतले आहेत, धन्य तो आमचा मामा शकुनी ज्याच्यामुळें आम्ही हे सगळे वैभव कांहींही न घालवता, एकाचाही जीव न जाता कांहीं क्षणात मिळवले आहे ह्यावर माझा विश्वासच बसत नाही. पांडवांचे शब्दाच्या, वचनाच्या बंधनात रहाण्यचे तत्त्व आम्हाला मोठे कमवून देत आहे. त्या त्यांच्या वचनबद्ध रहाण्यामुळें त्यांना एका परीने कमजोर केले आहे असें दिसते. पांडव नेहमी सांगत त्यांच्या बरोबरीचे कोणीही नाही हे शकुनी मामामुळें आता खोटे ठरले आहे. आज हे आम्ही कौरव सांगू शकतो व त्याला हे कुंतीपुत्र आव्हान देऊ शकत नाहीत कारण, ते त्यांच्याच शब्दात अडकलेले आहेत. अशी वचनबद्धता काय कामाची जी माणसाला कमजोर करते? अशा वाईट परिस्थितीत ते सोललेल्या तीळाच्या दाण्यासारखे झाले आहेत. मला आश्चर्य वाटते ह्यांचे कीं, अशी दैना झालेली असूनही ते पांडव तेजांने चमकत आहेत जणूकाय त्यांनी लढाई जिंकली आहे. त्यांना त्यांच्या हरण्याची आणि वनवासात जाण्याची कांहींच फिकर पडलेली नाही हें कसें? ते यज्ञाला निघालेल्या ऋषींसारखे कां दिसत आहेत? तो सोमक वंशी यज्ञसेन, ज्यांने त्याची लाडकी

मुलगी ह्या शूर पांडवांना त्याच्या पत्नीच्या स्वरुपात दान केली त्याला किती वाईट वाटत असेल कीं आता त्यांची लाडकी कन्या ह्या पांडवांबरोबर वणवण रानोमाळी भटकत रहाणार आहे. तो तिला कांहीं मदतसुद्धा करू शकत नाही. मी नुसती कल्पना करतो त्या द्रौपदीला तिचे पति रानावनात असं कातडे पांघरलेले पहातांना काय वाटेल त्याची. काय तिला त्यांना असें द्रव्यशून्य पांडव पाहायला आवडेल कां ती त्यांचा त्याग करून आपल्या भावाकडे दृष्टद्युमानाकडे जाईल? कां ती सुंदरी, त्या हरलेल्यांचा त्याग करून आमच्यापैकीं कोणाला तिचा पति म्हणून निवडेल, जर असे झाले तर ह्या पांच मर्दांची मोठीच फटफजिती होईल. मला खात्री वाटते कीं, ही राजकन्या ते हालअपेष्टेचे जीवन फारकाळ सहन करू शकणार नाही. त्यासाठी तिने तिचा दुसरा स्वयंवर मांडला तर येथे तिचा हात धरणार्या राजांची कांहीं कमी नाही. मी सांगतो, कृष्णा माझे ऐकेल व वनवासात न जाता येथेच हस्तिनापुरात मजेत रहाण्याचा निश्चय करील आणि असें झाले तर ह्या पांडवाची खरी खोड मोडेल. धनहीन, सत्ताहीन असें पांडव फोलपटासारखे झाले आहेत, त्यांच्या बद्दल माया बाळगणे शहाणपणाचे नाही. स्त्रीचा हक्क असतो मजेत रहाण्याचा, नाही कष्टात जगण्याचा". असें मनाला डांगण्या देणारे उद्गार दुःशासन पांडव आणि कृष्णाला ऐकू येईल अशा आवाजात बोलत असतो. ते दुष्ट विचार बोलणार्या कौरवाकडे भिम रागांने धावून जातो. जसें हिमालयातील सिंह कोल्ह्यावर धावून जावा. तो मोठ्याने शिक्षा करणार्याच्या अविर्भावात त्याला ताकीद देतो, "अरे पापी मन असलेल्या माझ्या चुलत भावा, तुझे हे बोलणे केवळ पापी माणूसच बोलू शकतात. जे घडले आहे त्यात तुम्हा कौरवांचे कांहींच श्रेय नाही. त्या गांधारच्या राजपुत्राची ती करामत होती व तुम्हाला कर्तव्य कांहींच नाही. तरी काय मोठ्या श्रेयाच्या गप्पा मारतो आहेस. तू जे हे कांहीं माझ्या चित्ताला जखमा करणारे बोल बोलत आहेस त्याच्या बदल्यात मी तुला जेव्हां आपले युद्ध होईल तेव्हां योग्यते शासन करणार आहे हे लक्षात ठेव. तूंच नव्हे तर तुझ्या मागे तुझे संरक्षक म्हणून जे वावरत आहेत त्यांनासुद्धा शासन होणार आहे. मी आता कांही करणार नाही कारण मी वचन बद्ध आहे नाहीतर आत्ताच तुझा फडशा पाडला असता. तुझ्याबरोबर त्या सगळ्यांना यमाच्या घरी पाठवणार आहे हे लक्षात ठेव".

ते वृकोदराचे बोलणे ऐकल्यावर तो निर्लज्ज कौरव आपल्या भावांच्या गराड्यात जाऊन भिमाला वेडावत नांचू लागला. तेवढ्याने त्याचे समाधान झाले नाही म्हणून तो सगळ्या पांडवाने चिडवण्यासाठी मोठ मोठ्यानो ओरडू लागला, "अरे, तू बैलं, तू बैलं".

भिम खूप चिडलेला त्याला ताकीद देतो, खबरदार अशी भाषा वापरलीस तर. पुढे भिम सगळ्यांच्या पुढे बोलतो, "जे घडले त्यात कौरवांचे कोणते असे कर्तृत्व होते कीं ते असे वागतात"? परंतु, संतापलेला वृकोदर पुनः धमकी देतो कीं, तो त्या दुःशासनाचे रक्त त्याची छाती फोडून पिणार आहे. पुढे तो महाबली ओरडून सांगतो, धृतराष्ट्राच्या मुलांचे बळी घेऊनच माझा हा संताप संपेल तोवर हा संताप मला माझ्या आव्हानाची आठवण करत राहिल. तेवढ्याने समाधान न झाल्याने तो बलशाली भिम दुःशासनाला त्याचे बकोटे पकडून उचलतो व दूर भिरकावून देतो. त्यानंतर तो महायोद्धा शकुनीकडे त्याचा मोर्चा वळवतो. ते पाहून दुर्योधन समजतो कीं, पांडवांनी त्यांच्या मोठ्या भावाला शब्द बंधाचे जे वचन दिले आहे तेंच आपल्याला संरक्षण देत होते ते आपण गृहीत धरले आहे ते जर भिम व त्यानंतर इतर तीन पांडव झुगारून देणार असतील तर आत्ताच आपला फडशा पडेल. म्हणून तो त्याच्या धूर्त धोरणाप्रमाणे युधिष्ठीराला सांगतो किं, त्यांने भिमाला आवरावे. युधिष्ठीर मात्र त्यावेळी भिमाला आवरण्याचे नाकारतो. तो सांगतो, "ज्या अर्थी आम्ही संन्यासी झालो आहोत मी माझ्या भावांवर कोणतेही बंधन लादू शकत नाही. आता प्रत्येक माझा भाऊ त्याला हवे तसें करू शकतो. जर तुम्हाला तुमची काळजी वाटत असेल तर असें परिस्थिती बिघडवणारे भाषण करणे बंद करावे. जर त्यांना तसें करावे असें वाटले तर त्याची  जबाबदारी त्यांना चिडवणार्याची असेल".

वैशंपायन सांगत असतात, त्यानंतर पांडव त्या सभागृहातून बाहेर पडले. ते दूर जात आहेत हो पाहून विकृत मनोवृत्ती असलेला दुर्योधन त्यांना त्याच्या पाठी वेडावत होता. त्याची कल्पना असलेला पांडव मागे वळून सभागृहाच्या प्रवेशद्वारात उभे राहून त्याच्याकडे पहात बोलतो, तुम्ही जिंकला असें समजू नका. कारण आम्ही परत येणार आहोत. त्यावेळी तुम्हाला पाहून घेऊ. मी परत आल्यावर तुझा आणि तुझ्या दोस्तांचा बळी निश्चित घेईन. तेंच माझे तुझ्या ह्या वागण्याला उत्तर असेल. नंतर थोडे स्वताला सांभाळून तो स्वतःशीच वचन बोलतो कीं, मी दुर्योधनाचा बळी घेणार, धनंजय कर्णाचा

बळी घेणार, सहदेव शकुनीचा बळी घेणार, असें बोलून तो म्हणतो, विधाता माझी इच्छा पूर्ण करो. त्यानंतर तो पंडुपुत्र पुनः गर्जना करतो कीं, जेव्हां युद्ध होईल तेव्हां मी दुर्योधनाला खाली पाडून त्याच्या छातीवर माझे पाय रोवून माझ्या गदेने त्याला ठार मारणार, तसेंच फालतु बडबड करणार्या दुःशासनाची छाती फोडून त्याचे रक्त रणभूमीवरच पिणार आहे". सभागृहातील सगळे राजे ते ऐकतात. त्यानंतर अर्जुन बोलतो, "अरें भिमा, खर्या श्रेष्ठ लोकांच्या केवळ वल्गना असून चालत नाहीत. म्हणून अहो राजांनो, आज पासून चौदाव्या वर्षी पहा काय होते ते". जमिनीकडे बोट करून तो संतापलेला वृकोदर गर्जना करतो कीं, "ही भूमी ह्या दुर्योधनाचे रक्त पिणार आहे हे आत्ताच सांगतो. आता फक्त तुमच्याकडे चौदा वर्षे आहेत. त्यात जी मजा करावयाची ती करून घ्या, त्यानंतर तुम्हाला आम्ही जीवंत ठेवणार नाही हे लक्षात घ्या. आमचे वैर करणारे सगळे कौरव ज्यात दुर्योधन, कर्ण, शकुनी आणि दुःशासन आहेत ते सगळे धारातीर्थी पडणार आहेत. त्यांना कोणीही वाचवू शकणार नाही". त्यानंतर अर्जुन भिमाकडे पाहून बोलतो, अरे भिमा, जसें तू सांगतोस तसे मी कर्णाचा वध युद्धभूमीत करीन व तुझा शब्द खरा ठरेल. पुढे तो बोलतो ह्या चौघानी त्याच्या वाचेने त्याच्या निर्घृण वधाचे निश्चित केले आहे. त्यांच्या मनातील द्वेष कां आहे आमच्या बद्दल ते समजत नाही. केवळ दुर्योधनाला खूष करण्यासाठी हा जो खटाटोप ह्या लोकांनी केला त्याची भारी किंमत त्यांना भरावयाची आहे. त्याशिवाय जे राजे कौरवांच्या नादी लागले आहेत त्यांचासुद्धा नाश अटळ आहे. जे वैर हे लोक दाखवत आहेत त्याला तत्वतः कांहींच समर्थन मिळत नाही. बुद्धीभ्रष्ट झाल्यासारखे हे मूर्ख लोक आमचा द्वेष करत आहेत. कदाचित ह्या सगळ्यांना यमाकडे पाठवण्याची जबाबदारी आमची विधात्याने केली असेल तर ते काम आम्ही पूर्णपणे करू. आमची हि प्रतिज्ञा दगडावरील रेष आहे. एकवेळ सूर्य पश्चिमेला उगवेल, हिमालय हलेल पण आमची प्रतिज्ञा कधीच आम्ही मोडणार नाही. अर्जुन बोलत असतो. "हे होवू नये असे जर कौरवांना वाटत असेल तर चौदाव्या वर्षी जेव्हां आम्ही परत येऊ तेव्हां ते आमचे राज्य आम्हाला परत आल्यावर देतील, नाहीतर हा तुमचा नाश होणे अटळ आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, अर्जुनाचे बोलणे झाल्यावर सहदेव तो माद्रीचा अतिदेखणा मुलगा बोलतो, मी शकुनीचा वध करणार जसें माझ्या वडील भांवांनी ठरवले आहे. तो ते

बोलतांना त्याचे हात तलवारीच्या हालचाली सारखे हलवतो. त्याचे डोळे लाल झाले होते संतापाने. उद्गारतो, अरें गांधारच्या राजपुत्रा तू आता संपलास. तू ज्यांना तुझ्या खोट्या फांशांच्या वापराने हरवले असें समजतेस ते खर्या अर्थाने अजिबात हरलेले नाहीत. आता माझ्या तीक्ष्ण बाणाच्या मारांने तुझा अंत होणार आहे. तुझी आता फक्त चौदा वर्षें उरलेली आहेत. भिमाने केलेली वाणी मी खरी करून दाखवीन. तेथे तुझ्या सगळ्या सैनिकासह तुला मी यमसदनाला पाठवणार आहे. तू लढायला खर्या क्षत्रियासारखा आला मात्र पाहिजेस. नाहीतर तुला हुडकून काढून मारीन. ते आपल्या धाकट्या भावाचे उद्गार ऐकून तो अप्रतिम देखणा त्याची भाऊ बोलतो, "मी त्या सगळ्या शंभर कौरवांचा खत्मा करीन. त्यांचा मृत्यू माझ्या हाती आहे त्यांच्या भाग्याप्रमाणे. त्याची बोलण्याची रीत अतिशय आक्षेपार्ह आहे म्हणून त्याचा नाश होणार आहे. माणसांने आपली वाणी सांभाळावयाची असते. परंतु पापप्रवृत्ती वाढल्याने ते साधी विवेकबुद्धी हरवून बसले आहेत. ज्या प्रकारे त्या लोकांनी यज्ञसेनेचा उपमर्द केला ते कोणीही सहन करू शकणार नाही. मी फक्त युधिष्ठीराच्या आदेशाची वाट पहात आहे. तो आला किं, मी ह्या पृथ्वीवरून कौरवांचा नामोनिशाण ठेवणार नाही".

वैशंपायन पुढे सांगत असतात, अशारितीने ते नरकेसरी त्यांच्या प्राबल्याने प्रेरीत असें एकमेकांना कौरवांच्या नाशाची ग्वाही देतात. ते आता वनवासात जाण्या आधी धृतराष्ट्राला भेटतात.

अशारितीने सभापर्वातील अनुद्युत पर्वाचा सत्याहत्तरावा भाग संपला.

# सभा पर्व भाग अठ्ठ्याहत्तरावा

(अनुद्युत पर्व पुढे चालू)

युधिष्ठीर धृतराष्ट्राला सांगतो, "अहो राजन, मी माझ्या भावांबरोबर तुम्हा सर्व भरत कुलिनांचा निरोप घेत आहे. माझे वृद्ध पणजोबा, भिष्माचार्य, राजा सोमदत्त, महान राजर्षी वल्हीक, गुरुवर्य द्रोण, शिक्षक कृपाचार्य, गुरुबंधू अश्वत्थामा, आमचे काका विदूर, धृतराष्ट्र, त्यांचे सर्व पुत्र, युयुत्सु, संजय आणि सगळे तुमचे दरबारी कारभारी अशा सगळ्यांना मी शेवटचा निरोप देण्यासाठी आलो आहे".

वैशमपायन सांगतात, ते सगळे पांडवांचे आप्त शरमेने लज्जित झालेले खाली मान घालून बसलेले होते, कोणीही कांहीं बोलण्याच्या मनस्थितीत नव्हते. तरी ते सगळे पांडवांच्या भविष्यात सुख समृद्धी आणि समाधान त्यांना प्राप्त हो अशी प्रार्थना करत होते. पांडवांच्या कल्याणाची प्रार्थना करण्या पलिकडे दुसरे कांहीं करण्याच्या स्थितीत ते नव्हते. थोडा वेळ स्थब्धता होती. त्यानंतर विदूर बोलण्यास सुरुवात करतात, "आमची पवित्र वहिनी पृथा, ही राजकन्या होती, ती ह्या वयात रानात जाणे उचित नाही. म्हणून मी तिची माझ्या घरात रहाण्याची व्यवस्था करणार आहे. तेथे ती पूर्ण सन्मानाने तुम्ही परत येई पर्यंत राहील हे माझे वचन आहे. तिची यत्किंचितही चिंता तुम्ही करू नये".

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकून पांडव त्यांना सागतात, "अहो पुण्यवंत, विदूर काका, तुम्ही जसे योजता तसेंच होईल. आपण आमचे काका म्हणजे पिता समान अहात. आम्ही सुरुवाती पासून नेहमी आपल्या आज्ञेतच राहिलो आहोत. तुम्ही आमचे आदरणीय अहात, म्हणून आमच्या मातेबाबतची आपली व्यवस्था आम्हाला संतोष देणारी ठरत आहे. आपल्याला आणखीन काय सांगावयाचे आहे त्याची आज्ञा असावी. ते ऐकून विदूर सांगतात, "अहो राजन, युधिष्ठीरा, तुम्ही भरत वंशाचे तेज अहात, एक गोष्ट माझ्या मनात आली आहे ती बोलून दाखवतो ती अशी कीं, जो पापमार्गाने पराभूत झाला आहे त्याला त्याच्या पराजयाची लाज वाटण्याचे कारण नसावे. तू नैतिकतेचे नियम चांगलेच जाणतोस. त्यानंतर धनंजयाकडे पाहून विदूर काका बोलतात, तू अजिक्य आहेस, भिमाकडे पाहून बोलतात, हा तर साक्षात शत्रूघ्न आहे, नकुल हा धनदौलत मिळवणारा आहे, आणि सहदेवाकडे पाहून बोलतात, हा बुद्धीचा मेरुमणी आहे. त्याची कार्य व्यवस्था अप्रतिम

असते. धौम्य ऋषींकडे पाहून तो बोलतो, त्याचे वेदांचे ज्ञान अद्वितीय असं आहे, नंतर द्रौपदीकडे पहात बोलतात, हि सद्गुणाची साक्षात खाण आहे. तुम्ही सगळे एकमेकांना खूप पसंत करता व तुमचे एकमेकाबद्दलचे प्रेम सगळ्या संकटांतून तुम्हाला तारेल. "तुमची एकी हींच तुमची ताकद आहे त्यामुळें तुमचे शत्रू तुम्हाला भेदू शकणार नाहीत. तुमची एकी व सलोखा तुमच्या शत्रूंच्या काळजाचा ठोका चुकवत आहे. अहो भरता, हे तुमचे नागरी जगातून जाणे होत आहे ते अंती तुमच्या व इतरांच्या भल्यासाठी आहे हे लक्षात असूद्या. तुमचा शत्रू जरी इंद्रासारखा बलवान असला तरी तो तुमच्या पुढे टिकाव धरू शकणार नाही. ह्या प्रवासात तुम्हाला निरनिराळे ज्ञानी मार्गदर्शन करतील, हिमालयात मेरु शवर्णी, वरनावतात कृष्ण द्वैपायन, भृगुच्या पहाडावर परशुराम शिकवतील, धृशद्वती नदीच्या तटावर शंभू स्वतः ज्ञान देतील, त्याशिवाय ऋषी असितांकडून मार्गदर्शन अंजनाच्या डोंगरात मिळेल, तुम्ही भृगुचे शिष्य कल्मशी नदीच्या तटावर होणार अहात. ह्यापुढे नारद आणि ऋषी धौम्य तुमचे मार्गदर्शक रहाणार आहेत. अशा संधी कोणाला मिळत नाहीत. त्यांचा पुरेपुर फायदा करून घ्या. ज्या अनागरी जगात तुम्ही जात अहात तेथे तुमच्या हुशारीला भरपूर वाव मिळेल त्याचा फायदा करून घ्या. अशा प्रकारे तुम्ही तयार झाल्यानंतर तुम्ही प्राचीन काळी झालेल्या ईलाच्या मुलांपेक्षा, पौरवांपेक्षाही जास्त सक्षम व्हाल. अशी तुमची तयारी झालेली असल्यामुळें पुढील काळात जे वाढून ठेवले आहे त्यात तुम्ही उत्तम प्रकारे यशस्वी व्हाल. तुमचा क्रोध संयमित होईल जसा यमाचा आहे, तुम्ही कुबेरासारखे दानी व्हाल, वरुण देवासारखे तुमचे तुमच्या वासनांवर पूर्ण नियंत्रण असेल. चंद्रा कडून संतोष मिळवाल, पाण्याकडून संयम शिकाल, पृथ्वीकडून सहनशिलता शिकाल, तेज सूर्याकडून, उत्साह वार्याकडून आणि समृद्धी इतर भूतांकडून शिकणार अहात. अशारितीने पूर्णत्वाला पोहोचलेले असें तुम्ही परत याल व आम्हाला भेटाल अशी शुभेच्छा करतो". "युधिष्ठीरा, विविध मोसमांत त्या त्या परिस्थितीप्रमाणे वागावयाचे असते ह्याचे भान राख. आमच्या सर्व शुभेच्छा सदैव तुमच्याशी आहेत. आम्ही सगळे जाणतो कीं, तुम्ही पवित्र अहात व जे घडले आहे व जे पुढे घडणार आहे तो नियतिचा खेळ आहे. जो कोणीही थांबवू शकत नाही. तुम्हाला सदैव कामयाबी मिळेल अशी प्रार्थना. आम्ही सगळे तुमच्या परत येण्याची वाट आतूरतेने पहात रहाणार आहोत".

वैशंपायन सांगतात किं, विदूराला काय बोलू व काय नको असें झाले होते. त्याचे पांडवांबद्दलचे प्रेम दिसत होते. ते ऐकल्यावर शातपणे ते पांडव, "तथास्तू", असे बोलतात. त्यानंतर भिष्म आणि द्रोणांकडे लवून नमस्कार करून ते निघतात.
अशारितीने सभापर्वातील अनुद्युत पर्वाचा अठ्ठ्याहत्तरावा भाग संपला.

# सभा पर्व भाग एकोणऐंशीवा

(अनुद्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, द्रौपदी तिचा पतींबरोबर जाण्यासाठी निघाली तेव्हां त्या राणीवसातून बायकांच्या ओक्साबोक्शी रडण्याचा आवाज सगळीकडे ऐकू येऊ लागला. ती तिच्या सासूला भेटण्यासाठी जाते, शेवटचा निरोप घेण्यासाठी, तेथे वातावरण दुःखाने भरलेले होते. द्रौपदी एकेकीला मिठी मारून निरोप घेत असते. त्यामुळें त्या अंतःपुराला शोककळा आलेली असते. कोणीही धडपणे बोलत नसते. कोणालाही कल्पना करता येणार नाही असें घडत होते व त्याची सगळी नैतिक जबाबदारी अर्थात् धृतराष्ट्रावर येत होती. कुंतीचे दुःख अनावर होत होते. तिने द्रौपदीला घट्ट पकडून कांहीं न बोलता त्या दोघी तशाच कितीतरी समय उभ्या होत्या. अखेरीस पृथा आपल्या सुनेला सांगते, तिचा आवाज कंठ भरून आल्यामुळें घोगरा झाला होता. ती बोलते, "माझ्या कृष्णा, हे संकट आले म्हणून चिंता करू नकोस, तुला तुझ्या स्त्रीच्या जबाबदार्यांची चांगलीच जाण आहे. तुझे वागणे त्यानुसार नेहमी राहिले आहे हे मी जाणून आहे. त्यामुळें मला कांहीं वेगळे तुला सांगण्याची आवश्यकता दिसत नाही. तुझे मधूर स्मित त्या माझ्या मुलांना धीर देण्यास पुरेसे आहे असें मी समजते. तू तुझ्या माहेरच्या व सासरच्या अशा दोनही कुळांना अभिमान वाटावा अशीच आहेस. तू यज्ञजा आहेस म्हणजे तुझा जन्मदाता साक्षात अग्नीदेव आहे. तुझ्या संयमामुळें ते कौरव आज जीवंत आहेत, जर तू शाप दिला असतांस तर ते सगळे कौरव भस्मसात झाले असते. तुझ्या संयमाची मी प्रशंसा करते. वनात तुमचा समय प्रसन्नतेत जाईल कारण तेथे क्रोध, मद आणि मत्सर नसतील, फक्त निर्व्याज निष्पापता तुला त्या निसर्गात अनुभवायला मिळेल जे माणसांत मिळणे दुरापास्त असते. माझ्या प्रार्थना तुझ्या बरोबर असतील. वनातील प्राणी, वनस्पति पाप करत नाहीत कारण त्यांना लोभ आणि मोह नसतात. त्यांचे जीवन जगण्यापुरते संयमित असते, तेथे महत्वाकांक्षा, आसुया, तिरस्कार, तुलना, द्वेष नसतात. म्हणून ते जीवन निष्पाप समजले जाते तशा वातावरणात तू तुझी अध्यात्मिकता वृद्धींगत करशील जे तुम्हा सर्वांना पुढे उपयोगी ठरेल. माझ्या धाकट्या मुलांवर विशेष लक्ष ठेव. मला त्याची फार चिंता वाटते. तो भावुक लवकर होतो त्याला अडचणीच्या प्रसंगी तुझा आधार असू दे. तुझा भिम तसांच झटकन रागावतो,

त्यालासुद्धा तूंच शांत करू शकशिल". कुंतीला बोलावे काय ते समजत नव्हते पण ती बोलत होती. शेवटी निरोप देण्याची वेळ येते. द्रौपदी तथास्तू असें बोलून निरोप घेते. तिच्या अंगावर रक्ताचे जाग पडले होते. तेंच एकमेव वस्त्र नेसून ती महासाध्वी वनवासाला निघते. ती जात असतांना कुंती तिच्या बरोबर चालत जाते . पुढे आल्यावर ती पहाते तिचे पांच पुत्र त्यांच्यावरील राजवस्त्र काढलेले असतात. ते चामड्याच्या एकवस्त्रात द्रौपदीची वाट पहात उभे असतात. त्यांच्या माना खाली असतात जणू ते शरमेने लज्जित झाले आहेत. ती पहाते किं, त्याच्या भोवती त्यांचे शत्रू आनंदात चेष्टा मस्करी करत आहेत. मातृप्रेमांचा उमाळा तिला अनावर होतो व ती झटकन तिच्या लेकरांकडे धावत जाते व त्यांना प्रत्येकाला आलिंगन देते. ती त्यांना सांगते, "मुलांनो, तुम्ही पुण्यवान अहात, सुस्वभावी अहात, गुणवान अहात, तेजस्वी अहात, शूरयोद्धे अहात, तुमचे नैतिक बळ अतुलनीय आहे, तुमची बुद्धी श्रेष्ठ दर्जाची आहे, तुम्ही तुमच्या पूर्वजांचे हितचिंतन करणारे अहात, तुम्ही श्रद्धावान अहात, तुम्ही तुमचे यज्ञ वेळच्या वेळी करत अहात, असें असूनही तुमच्यावर हा प्रसंग का गुदरला हे समजत नाही. तुमचे भाग्य असे कसे उलटले ते समजत नाही. मी तुमचा सांभाळ केला तुम्हाला मोठे केले, कदाचित माझेच कांहीं चुकले तर नाहींनां"? माझ्या चुकीमुळें जर तुम्हाला ह्या संकटाला सामोरी जावे लागत असेल तर, मला माझी चूक कोणती ते शोधावे लागेल. कदाचित तुमच्या पित्याच्या निधना नंतर व माद्रीच्या सती जाण्यानंतर मी शतक्षृग पर्वत सोडून हस्तिनापुरात आले तिंच माझी चुक असेल कां? तुमचे पिता व माता माद्री खरोखरच नशिबवान समजले पाहिजेत कारण ते संन्यासाश्रमात संतुष्ट जीवन जगत होते. माझी भगिनी माद्रीसुद्धा नशिबवानच म्हंटले पाहिचे कारण ती सुद्धा तुमच्या पित्याबरोबर निघून गेली मला एकटीला तुमच्यासाठी मांगे ठेवले. माझा जगण्याचा मोह मला आता भोगावा लागत आहे. असेंच जर जगावयाचे होते तर त्यापेक्षा तुमच्या पित्याबरोबर जाणेच जास्त श्रेयस्कर ठरले असते. हि माझी कृष्णासुद्धा मला सोडून तुमच्यासह जात आहे. हे जीवन शेवटी नष्टच होणार असते मग जगावयाचे तरी कां? ब्रह्मदेव माझ्या मृत्यूचा विचार करण्यास विसरला आहे कां? तेंच खरे असेल म्हणून माझे जीवन संपत नाही. मला आणखीन काय दुःख भोगावयाचे आहे"? कुंती त्यानंतर दामोदराची आठवण करते . ती स्वताशी बोलते, "अरें दामोदरा,

शंकरशनाच्या धाकट्या भावा, तू द्वारकेस काय करत आहेस? येथे तुझ्या भावांचे काय हाल होत आहेस ते तू नुसता बघत बसणार कां? असे सांगतात, तुझी सुरुवात नाही आणि तुझा अंत सुद्धा नाही आणि असें सांगतात, जे तुला मनापासून स्मरतात त्यांच्या मदतीला तू धावतोस. मग येथे तू कां नाही येत? तुला माहीत आहे किं, माझी मुलं गुणी आहेत व सदैव तुझेच स्मरण करतात मग त्यांना तू कां नाही येत मदत करण्यासाठी? त्यांच्या भाग्यात हे असें भोग कां लिहीले आहेत? कांहीं कृपा करशिल कां? आमच्या कुटूंबात सगळे ज्ञानी आहेत नितिशास्त्र ते चांगले जाणतात तरी त्याचा ह्या मुलांना कां फायदा होत नाही. नेहमी माझ्याच मुलांवर असे प्रसंग कां येतात. आजपर्यंत किती वेळा ते अशारितीने देशोधडीला लागले ते तू पहात आहेस, हें काय होत आहे ते समजेल कां? हे सगळे माझ्या पति पंडुपासून सुरु झाले आहे. त्यांचा कोणताही दोष नसतांना त्यांना असें कां भोगावे लागते, कांहीं उत्तर तुझ्याकडे आहे कां"? नंतर ती तिच्या सर्वात लहान मुलाकडे पहात म्हणते, "बाळा सहदेवा, तू माझा सर्वात जास्त लाडका आहेस तू तरी माझ्याकडे थांब, बाकीच्या मोठ्यांना जाऊ दे. तुझ्या शिवाय मला करमणार नाही. माझ्यावर कृपा कर आणि येथेच थांब. माझ्यासाठी थांबल्याने तुला पुण्य प्राप्त होईल". वैशंपायन सांगत असतात, पांडवांना त्यांच्या आईचा आकांत ऐकवत नाही परंतु, प्राप्त परिस्थितीत तिच्या मागणीची पूर्तता शक्य नसल्याने ते सगळे त्यांच्या मातेचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करतात. तिला इतर बायका सांभाळून घेतात व हे सहा जण आपल्या प्रवासास निघतात. विदूर सुद्धा मोठ्या मिनत्वारीने कुतीला पांडवांपासून दूर करतो व आपल्या घरी तिला घेऊन जातो. तो त्यांचा काका पांडवाना आश्वासन देतो कीं, त्यांच्या मातोश्रीबाबत निशंक रहावे. धृतराष्ट्राच्या परिवारातील बायकांना जेव्हां त्या सभागृहात मागे काय झाले होते, कसे कौरव द्रौपदीला विवस्त्र करण्याचा प्रयत्न करत होते वगैरे, तेव्हां त्यांच्यातील बर्याच जणी टाहो फोडून रडू लागल्या होत्या. त्या त्यांच्या पतींचा धिक्कार करू लागल्या होत्या. पांडव गेल्यानंतर त्या घरातील बायका कांहीं न बोलता गप्प बसलेल्या होत्या, कोणाला कांही सुचत नव्हते. जणू त्या घरात मयत झाले आहे असेंच कोणालाही वाटावे असे सगळे दृष्य होते. एवढे झाल्यावर सावकाशपणे आपण कोणती मोठी घोडचूक केली त्याचा अंदाज त्या अंध राजाला, धृतराष्ट्राला येऊ लागतो. त्यामुळें तो

संशय व चिंता ह्यांच्या भोवर्यात अडकत जातो. पुढे आपल्या मुलांचे काय होणार त्याच्या विवंचनेने तो व्यथित होतो, परंतु, आता सगळे हाताबाहेर गेले आहे तेसुद्धा त्याला समजते व त्यामुळें तो आणखीन घाबरून जातो. त्याला काय करावे ते समजत नाही. तो त्याचा धाकटा भाऊ व राज्याचा प्रधान विदूर ह्याला बोलावणे धाडतो. त्यांचे बोलावणे आल्याने तो कुरुराजाचा प्रधान त्वरित त्याच्या पुढे हजर होतो. तो आल्यावर धृतराष्ट्र त्याला विचारतो, "काय, पंडुची मुलं वनवासाला हस्तिनापूर सोडून गेली काय"?

अशारितीने सभापर्वातील अनुद्युत पर्वाचा एकोणऐंशीवा भाग संपला.

# सभा पर्व भाग ऐंशीवा

(अनुद्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, विदूर धृतराष्ट्राच्या समोर हजर झाल्यावर तो अंध राजा, अंबिकेचा मुलगा त्याला भित भित विचारतो, "युधिष्ठीर, यमाचा पुत्र व त्याचे भाऊ वनवासाला गेले कां? अर्जुनाचे कसे काय, ते दोघे माद्रीचे कसे आहेत, धौम्य ऋषीं त्यांच्या बरोबर गेले कां"? द्रौपदीचे कसे झाले, अरे खत्ता मला सगळे सविस्तरपणे सांग. मला त्यांच्या सगळ्या हालचालींची इत्थंभूत माहिती कळली पाहिजे".

विदूर त्याला सांगतात, युधिष्ठीर कुंतीपुत्र आपला चेहरा झाकून निघून गेला. भिम त्याचे पिळदार दंड थोपटत गेला जणूकाय त्यांने कौरवांचे आव्हाव घेतले आहे. अर्जुन वाळूचे कण चौफेर फेकत गेला जसें चौदा वर्षानंतर जे महायुद्ध होणार आहे त्यावेळी ते त्या वाळूच्या कणाप्रमाणे त्याच्या तीक्ष्ण बाणांचा वर्षाव करून कौरवांचा विध्वंस करेल. नकुल व सहदेव आपले चेहरे काळ्या रंगाने रंगवून गेले. कृष्णा विधवेसारखी गेली हे दाखवत किं, चौदा वर्षानंतर कौरवांच्या बायका जेव्हां विधवा होतील त्याचे दर्शन तिने केले होते. अशारितीने ते सगळे सुचक मात्रा देत गेले. त्यात त्यांना किती दुःख झाले आहे ते स्पष्टपणे दिसत होते. धौम्य ऋषी सामवेदातील यमाची आळवणी करणारे साम गात गेले. त्यांच्या कडील पात्यात कुस गवताची पाती होती. नैऋत्य दिशेकडे ती पाती त्यानी धरली होती. असें साम मृत्यूचे दर्शक असतात, अहो राजन. तुझ्या मुलांनी कारस्थानं करून त्यांची संपत्ति हडपली, त्यांना रस्त्यावर आणले परंतु, तो राजा आपली नियत विसरला नाही. तो अजूनही तुझ्या मुलांचे भलेच व्हावे असें बोलत आहे. परंतु, त्याच्या आत्म्याचा तळतळाट बाहेर येऊन त्यामुळें तुझ्या मुलांचे भस्म होऊ नये म्हणून त्यांने त्याचे डोळे झाकलेले होते व त्यासाठी त्यांने त्याचा चेहरा झाकला होता. त्याचा क्रोध पापमय कृत्याबद्दलचा होता व ते कर्म करणारे नष्ट करणे हेंच क्षत्रियांचे कर्तव्य असते म्हणून भिम सुद्धा आपले बलाढ्य हात पिळत तुझ्या मुलांना चौदा वर्षानंतर युद्धात भेटण्याचे सांगत गेला. अर्जुन त्याचे गांडीव हातात असल्यासारखा वागत होता. बाकीचे दोन त्यांचे दुःख लपवू शकत नव्हते. धौम ऋषींच्या त्या यमाची स्तुती करणारे साम गाण्याचा अर्थ अरे राजन, स्पष्ट होता, तुझे पुत्र आता फक्त चौदा वर्षे रहाणार आहेत, त्यानंतर जे युद्ध तुझ्या नालायक दुर्योधनामुळें

सर्व क्षत्रियांवर लादले जाणार आहे त्यात तुझे सगळे पुत्र मारले जाणार आहेत. हा भविष्यातील होणारा अनर्थ तू योग्य निर्णय घेऊन टाळू शकला असतास, परंतु तू ते केले नाहीस. अरे राजन, हस्तिनापुरातील प्रजा त्यांच्या अशारितीने जाण्यामुळें फार दुःखी झाली आहे. ते रडत रडत बोलत आहेत, त्यांचा खरा राजा त्यांना सोडून गेला. पुनः पुन्हा ते असें ओरडत आहेत. हा जनतेचा तळतळाट तुला अंती भोगावा लागणार आहे हे तुझ्या ध्यानी आले आहे कां? सगळी प्रजा कुरु घराण्याच्या वरिष्ठांची छीः थूः करत आहे. आपली मान प्रजेच्या नजरेत उतरली आहे. पांडवांचे सर्वस्व अशारितीने कौरवांनी तुझ्या संम्मतिने लुटले आहे मग अरे राजा तुझ्यात व इतर दरोडेखोरात काय फरक उरला असा प्रश्न विचारला जात आहे. कुलिन क्षत्रियांना शोभणार नाही असेंच तुझे मुलगे तुझ्या संम्मतिने वागले आहेत. त्यामुळें जे पाप झाले आहे त्यात तुझा वाटा राजाचा आहे म्हणजे सर्वात मोठा आहे हे तुझ्या लक्षात येते कां? तुझी प्रजा सांगते जो राजा त्याच्या पुतण्याना न्यायाने वागवू शकत नाही त्याकडून आपण काय अपेक्षा करू शकतो? ते विचारतात, जेथे राजकन्या उघड्यावर विवस्त्र करण्याचा भर सभेत प्रयत्न होतो व सगळे राजे नुसते पहात रहातात अशा राज्यात बाया बापड्या कशा संरक्षित रहाणार? ह्यांना आम्ही आमचे राजे म्हणून कोणत्या तोंडाने बोलणार? अरे राजा जसें ते पांडव हस्तिनापूरातून बाहेर पडले आकाशांत विजा चमकू लागल्या व त्यांचा कडकडाट जीवाला बेचैन करणारा होता. पृथ्वीचा सुद्धा थरकाप झाला. आकाशातून अशनी जमिनीवर कोसळले. कुत्री, कोल्हे, खेचरं एकच ओरड करू लागली. आकाशात गिधाडं, कांवळे घिरट्या मारू लागले होते त्यावरून ती अशुभ लक्षणं आहेत हे स्पष्ट होत होते. हे सगळे तुझ्या चुकीच्या निर्णयाचे परिणाम आहेत".

वैशंपायन पुढे सांगतात, ज्यावेळी अशारितीने विदूर व धृतराष्ट्र संभाषण करत होते, त्यावेळी एक दैवी प्रसन्नता असलेले ऋषी तेथे जमलेल्या सगळ्यांच्या समक्ष कौरवांच्या त्या सभेत अवतरले. तो तेजस्वी ऋषी जे भयंकर उद्गार काढतात ते असें, "आजपासून चौदा वर्षानंतर दुर्योधनाच्या खोट्या कामामुळें सगळे कौरव व त्यांचे दोस्त भिमाच्या आणि अर्जुनांच्या हातून मारले जाणार आहेत". असें बोलून तो वैदीक ऋषी आकाशात निघून गेला. ते पाहिल्यावर दुर्योधन, कर्ण, शकुनी त्यांच्या गुरूला द्रोणांना विचारतात, कीं, ते

त्यांचे सगळे राज्य त्यांना देऊ इच्छित आहेत. ते ऐकून द्रोण त्याना काय बोलतात ते सांगतो, मत्सरी, क्रोधाने लालबुंद झालेल्या दुर्योधनाला, दुःशासनाला आणि कर्णाला ते सांगतात, "ऐका, तुमचे चुलत भाऊ दैवी अवतार आहेत. म्हणून ते माणसासारखे मारले जाणार नाहीत हे प्रथम लक्षात घ्या. त्या उलट धृतराष्ट्राच्या मुलांचे आहे. तरीसुद्धा तुम्ही मला सांगता म्हणून मी माझ्या कुवतीनुसार तुम्हाला संरक्षण देण्याची कोशिस करीन पण शेवटी भाग्य काय आहे ते सांगता येणार नाही. दुसरी गोष्ट अशी किं, ते पांडव सुद्धा माझे शिष्य आहेत त्यांच्यावर जो अन्याय झाला आहे त्याची जबाबदारी तो अन्याय करणार्यांवरच असेल कारण, त्या अन्यायात मी भागिदार कधीच नव्हतो. पांडवानी दिलेल्या वचनाप्रमाणें ते आता वनवासात गेले आहेत. ते ब्रह्मचर्य पालन करणार आहेत, त्यामुळें ह्या चौदा वर्षात ते दैवी सामर्थ्य संपादन करून येणार आहेत हे लक्षात घ्या. त्यांनी बोलल्या प्रमाणे ते तुम्हाला तुमच्या कर्माची शिक्षा करणार हेसुद्धा निश्चित आहे. ते आल्यावर तुम्ही त्यांना शत्रू मानत असल्यामुळें प्रतिक्रिया स्वरुप तेसुद्धा तुम्हाला त्यांचे शत्रूच मानणार व त्यामुळें जे युद्ध होणार त्यात त्यांच्या बरोबर त्यांचे दोस्त त्यांना सामील होणार हेसुद्धा निश्चित आहे. त्यात द्रुपदाचा यज्ञज पुत्र दृष्टद्युम्न हमखास सामील होणार, मला त्याची फार भिती आहे कारण, तो माझा वध करणार हे पूर्वसंकेतानुसार ठरलेले आहे. त्याच्या पित्याला मी तुमच्या मदतीनेच ज्यात तुम्ही सगळे पांडव धरून होते, तुम्ही माझी गुरूदक्षिणा म्हणून पांचाल काबीज केला होता ते तुम्हाला आठवत असेलच. त्यामुळें त्यानंतर निपुत्र असलेल्या द्रुपदाने एक यज्ञ केला होता, यज आणि उपयजांच्या पौरोहित्यात. त्यावेळी दोन अपत्ये त्या यज्ञातून बाहेर आली तेसुद्धा तुम्हाला आठवत असेलच. तो यज्ञ करण्या मागचा राजा प्रिशताचा, द्रुपदाचा उद्देशच होता मला ठार मारणारा दैवी पुरुष उपजावा. त्या प्रमाणें, ती दोन अपत्ये जन्मली होती त्या यज्ञकुंडातून . त्यातील एक दृष्टद्युम्न व दुसरी कृष्णा. हा दृष्टद्युम्न जन्मला तेंच शस्त्रधारी होता. तो मला ठार मारणार आहे कारण तोंच तर त्याच्या जन्माचा उद्देश आहे. दुसरी कृष्णा, तिचा तुम्ही लोकांनी विनाकारण अपमान केला आहे त्यामुळें तिचा भाऊ जास्तच संतापलेला आहे. पांडवांप्रमाणे तो व त्याची बहिण दोघेही माणसासारखे मरणार नाहीत जसे आपण मरणार आहोत. माणूस म्हणजे तो गर्भज असतो त्याप्रमाणे त्याचा मृत्यू असतो. दृष्टद्युम्न यज्ञज

म्हणजे अग्नीदेवाचा मुलगा आहे म्हणून तो त्याचे कार्य झाले मला ठार मारण्याचे कीं, सदेह स्वर्गात जाईल. तेंच द्रौपदीचे व ह्या पांडवांचे होणार आहे. हा फरक त्यांच्यात व आपल्यात आहे म्हणून त्यांच्यासाठी वेळोवेळी आकाशवाणी होत असते. माणसांसाठी अशाप्रकारे आकाशवाणी होत नाही हे लक्षात घ्या. मला अशारितीने मरण येणार ह्याची फार खंत वाटते. अरे दुर्योधना तो सर्वनाशाचा काळ जवळ येत आहे ह्या कल्पनेने मी बेचैन होतो. सगळेच अखेरीस संपते परंतु ते अशाप्रकारे व्हावे हे दुःखदायक आहे. तुम्हाला वाटते त्या पांडवांना वनवासात धाडून सर्वकांहीं साध्य झाले तर तो तुमचा गैरसमज आहे. अरे दुर्योधना, ते पांडव माणसं नाहीत ते दैवी पुरुष आहेत त्यांची व आपली तुलना होत नाही. आपण कितीही केले तरी तेच अखेरीस जिंकणार हे लक्षात घ्या. तुमची खुषी फक्त चौदा वर्षे राहिल त्या नंतर युद्ध व त्यात दारूण पराभव आणि सर्वनाश हे अटळ आहे. जे काही पुण्य जमवावयाचे आहे तुमच्या पुढच्या प्रवासासाठी (मृत्यूनंतरचा प्रवास असा अर्थ आहे) तेवढे जमा करा, त्यासाठी यज्ञ करा, दानं करा, न्यायांने वागा, कोणाचाही विनाकरण उपमर्द करू नका, मुख्य म्हणजे पांडवांचे भले चिंतन करा, जे तुम्ही कधीच करू शकणार नाही. हे सगळे तुम्हाला करण्यासाठी फक्त आणि फक्त चौदा वर्षे आहेत. तो काळ झपाट्याने सरकेल".

वैशंपायन पुढे सांगतात, द्रोणांचे ते बोलणे ऐकून धृतराष्ट्र बोलतो, "अरे खत्ता, विदूरा, गुरू जे बोलतात ते खरे कां"? तसे होणार असेल तर त्यापेक्षा पांडवांना ताबडतोब परत बोलवून घे. त्यांचा मानसन्मान करू या, त्यांच्याशी वैर संपवून टाकू एकदाचे. परंतु जर ते आले नाहीत तर माझ्या मुलांनो तुमची शस्त्रं घेऊन त्यांचे स्वागत करण्यासाठी जा.

अशारितीने सभापर्वातील अनुद्युत पर्वाचा ऐंशीवा भाग संपला.

# सभा पर्व भाग एक्याऐंशीवा

(अनुद्युत पर्व संपले)

वैशंपायन सांगतात, द्युतात हरल्यानंतर आणि पांडव त्याकारणाने वनवासात गेल्यामुळें दिवसें दिवस तो म्हातारा अंध राजा, धृतराष्ट्र काळजीने व्यथित होत होता. अशा अवस्थेत तो अस्वस्थ असा बसलेली असतांना त्याचा विश्वासु सुत सेवक संजय त्याला बोलतो, "अहो राजन, आता सगळी पृथ्वी तुमच्या पायाशी लोळण घेत आहे, कांही जिंकण्यासारखे राहिलेले नाही अशा उत्तम स्थितीत तुम्ही असतांना काळजी कशासाठी करत अहात"? "ते पंडुचे मुलगे, तुम्ही युक्तीने त्यांचे राज्य हडप करून त्यांच्या वचनबद्धतेचा गैर फायदा घेऊन, तुम्ही वनवासात पाठवले आहेत आता तुम्हाला कोणाचीही भिती उरलेली सुद्धा नाही मग फिकीर कशाची पडली आहे आपल्याला"?

धृतराष्ट्र त्याला सांगतो, "अरे चौदा वर्षानंतर ते येणार व माझे पुत्र त्यांच्या क्रोधाची शिकार होणार आहेत, ह्या विचारांनी मी दिवसें दिवस काळजी करत आहे. सगळ्या जगाला माहीत आहे कीं, त्यांच्यावर माझ्या लेकरानी घोर अन्याय केला आहे व म्हणून हे जग त्यातील सगळे सत्शिल राजे आमच्या विरुद्ध आणि पांडवांच्या बाजूने युद्धात उभे होणार आहेत, त्याचा परिणाम काय होणार त्याची विवंचना मला सतावत आहे".

संजय ते ऐकल्यावर धृतराष्ट्राला सांगतो, "अहो राजन, हि सर्व शत्रूत्वाची परिस्थिती तुमच्या मोहातूनच तर उत्पन्न झाली आहे. त्यामुळें त्यावर आता काळजी करून काय साध्य होणार आहे? तुम्हाला भिष्माचार्यांनी, ताकीद दिली होती, विदूरानी सावध केले होते तरी तुम्ही तुमच्या अविचारी दुर्योधनाच्या बोलण्यावर विसंबून जे केले त्याचे परिणामस्वरुप जे भविष्यात घडणार ते अटळ आहे. द्रोणाचार्यांनीसुद्धा तुम्हाला पुढील परिणामांबद्दल चांगलेच अवगत केले होते, तरी त्या सगळ्यांपेक्षा तुम्हाला तुमचा मुलगा जास्त योग्य वाटला त्यात दोष केवळ तुमचाच आहे नां? कोणतीही गोष्ट करण्या आधी त्यांच्या परिणामाचा पूर्ण विचार करणे हे शहाण्या राजाचे लक्षण मानले जाते, कोणतीही गोष्ट करण्या आधी इतर विद्वानांचा सल्ला घ्यावयाचा असतो असें राज शास्त्रात सांगितले आहे पण तुम्ही तुमचे निर्णय तुमच्या भावनांच्या आवेगातच घेत गेला. असे सगळे तुम्ही केले, मग त्याच्या परिणामांना घाबरून काय उपयोग"?

तुमच्या मुलांनी त्यांच्या गुणी पत्नीची विनाकारण अवहेलना केली, त्याला तुम्ही त्याचवेळी आक्षेप सुद्धा घेतला नाही, जेव्हां विनाश काळ समीप येतो तेव्हां माणसाची बुद्धी काम करत नाही. बर्याच गोष्टी त्या सभागृहात होत होत्या तुमच्या समोर पण तुम्ही त्या अयोग्य कृत्यांचा निषेध न करता ते सगळे होऊ दिले. आता शोक करून काय उपयोग. अशा विनाश काळी माणसाला पाप, पुण्य वाटू लागते व पुण्य, पाप वाटू लागते. त्या प्रमाणें तो नेमके उलटे निर्णय घेत जातो. अयोग्य निर्णय त्याला योग्य वाटू लागतात व योग्य निर्णय अयोग्य वाटू लागतात. असा भ्रष्ट बुद्धी झालेला माणूस अधिकाधिक विनाशाकडे ढकलला जातो व तो त्याच्या बरोबर त्याच्यावर विश्वास ठेवणार्यांना सुद्धा खेचून नेतो. आता हेंच पहा, त्या असहाय राजकन्येला त्या सभेत तिच्या त्या अवस्थेत अपमानकारकरित्या खेचून आणण्याची काय गरज होती? दुर्योधनाचा राग युधिष्ठीरावर आहे कारण तो त्याच्या आधी एक वर्ष जन्मला! त्यात सुद्धा वस्तुतः युधिष्ठीराचा काय संबंध, ती नियतिची व्यवस्था होती. परंतु, भ्रष्ट बुद्धी असलेल्या तुमच्या मुलाला ते समजत नव्हते. त्याच्या त्या विकृतीला आवर घालावयाचे सोडून त्याचा भाऊ दुःशासन उलट आणखीन आग ओतत होता. त्यामुळें परिस्थिती बिघडत गेली. म्हणतात नां, वडाचे तेल वांग्या वर, तसा सगळा प्रकार होता. त्यात विवेकाचा संपूर्ण अभाव होता, तसें झाले नसते व केवळ द्युत हरले असते तर माझ्या मते परिस्थिती इतकी बिघडली नसती. द्रौपदीचे वस्त्रहरण कौरवांना भारी जाणार आहे हे त्याच वेळी मी समजलो होतो पण तुम्ही कांहीं विरोध करत नव्हते. निदान विदूर काय बोलतात ते तुम्ही पहायला पाहिजे होते पण तेसुद्धा तुम्ही जरूरी समजला नाहीत. हा जो प्रकार झाला तो तुम्ही टाळू शकला असतां पण ते झाले नाही. मग आता कसली काळजी करत बसला अहात"? द्रौपदी साधारण बाई नाही, ती यज्ञातून आलेली अग्नीदेवाची कन्या आहे त्याचेसुद्धा भान त्या दुःशासनाला राहिले नव्हते. आर्य राजांच्या दरबारात असें प्रकार आधी कधीही झालेले नाहीत. सगळी प्रजा कौरवांना व आपल्याला छिः थूः करत आहे. काय किंमत राहिली आहे तुमची? हे सगळे तुम्ही टाळू शकला असता पण पुत्रप्रेमा खातर तुम्ही एका मागोमाग एक असे पापकृत्य करण्यास तुमच्या मुलांना प्रोत्साहन देत गेला, त्यांना न अडवून त्याचा दोष तुम्हालाच लागणार आहे. द्रौपदीवर अन्याय होत असतांना ते पांडव त्याच्या वचन बद्धतेमुळें तिला मदत

करण्यास येऊ शकले नाहीत पण तुम्ही ते करू शकला असता. एक आवाज दिला असतां तर हे जे पाप कृत्य घडले ते झाले नसते. तुमच्या मुलांच्या सोबतीत रहाणारे त्यांच्या उपकाराने दबलेले कर्ण त्या आगीत तेल ओतत होते. त्या सगळ्याची तोंड केवळ अपमान कारक बोलण्यात रमली होती, ते जे बोलत होते ते किती घृणास्पद होते ते तुम्ही ऐकत होता. ते ऐकल्यावर तुम्हाला त्यांना आवरता आले असते, मग कां नाही आवरले त्यांना? पाप करणारा व पाप कृत्याला विरोध न करणारा हे दोघेही सारखेच पापी ठरतात हे आपण जाणता. त्या नितिशास्त्राच्या न्यायाने तुम्ही सुद्धा त्या पापात समान मुल्याने भागिदार झाला अहात व म्हणून त्याचे कटू फळ तुम्हाला भोगावे लागणारच. द्रौपदीवर झालेल्या अन्यायासाठी हस्तिनापुरातील सगळ्या बायका आजही रडत आहेत व राजाला म्हणजे तुम्हाला शाप देत आहेत, त्या सगळ्याचा परिणाम तुम्हाला भोगावा लागणार हे निश्चित".

धृतराष्ट्र ते ऐकून बोलला, "अरे संजया, त्या अवस्थेतील त्या प्रिशताच्या मुलीच्या दृष्टीने सगळी पृथ्वी जळून गेली असती. तरी माझ्या एकाही मुलाला कांहीं झाले नाही. तिला त्या अवस्थेत माझा मुलगा खेचत आणतांना पाहून माझ्या परिवारातील सगळ्या बायका आकांत करू लागल्या होत्या. आजही त्या शरमेने ते आठवले कीं, रडू लागतात. मला माहीत आहे माझ्या मुलांच्या अशा असुरी कृत्याचा निषेध करण्यासाठी ब्राह्मणांनी यज्ञ करण्याचे बंद केले आहे. वारे उलट दिशेने पाहू लागले आहेत. जसें जगबुडीच्या वेळी होते. त्यावेळी भयंकर वादळ सुरु झाले होते, अशनी आकाशांतून कोसळू लागले होते. राहू सूर्याला खाण्यासाठी पुन्हा तयार झाला होता. आमच्या रथांनी अचानकपणे आग पकडली होती व त्यावरील दिमाखदार ध्वज आणि त्यांचा खांबा कोसळून पडले होते. हि सगळी अशुभ लक्षणं त्याकाळी उपस्थित झाली असें मला सांगण्यात आले आहे. कोल्हेकुई सगळ्याना ऐकू आली व तीसुद्धा दुर्योधनाच्या घरातून येत होती. खेचर खिंकाळू लागली, कावळे आकाशात घिरट्या घालू लागले, त्यानंतर भिष्म, द्रोण, सोमदत्त, महान ऋषी वल्हिक आणि कृपाचार्य जे त्या सभेत उपस्थित होते, त्यावेळी विदूराने मला कांहीं सल्ला दिला होता हे स्मरते. तेव्हां मी कृष्णाला वर मागण्याचे आवाहन केले होते ते स्मरते. तिला मी बोललो, तुला काय पाहिजे तो वर मांग. तिने फक्त तिच्या पतिंच्या मुक्ततेची तेवढीच मांगणी केली होती ते सुद्धा आठवते. तरी मी माझ्या स्वताच्या विचारांनी त्यांना त्यांचे

सर्वस्व जे ते हरले होते ते देऊन टाकले. त्यावेळी माझा भाऊ मला बोलला होता, हे दिले तरी माझ्या कुळाचा नाश होणे ठळत नाही. कारण वंशाचा नाश त्या संपत्ति व राज्यामुळे नाही तर कृष्णाच्या अपमानामुळें होणार आहे. हे त्याचे बालणे मला चांगले आठवते. अपमान झाला कीं, त्याचे परिणाम चुकत नाहीत, त्याला उःशाप नसतो म्हणून कोणी कोणाचा विनाकारण अपमान करू नये, जो अयोग्य आहे. द्रौपदी म्हणजे साक्षात लक्ष्मी तिचा अपमान केल्यानंतर कौरवांची लक्ष्मीसुद्धा नष्ट होणारच हे ठरलेले होते असें तो विदूर मला म्हणाल्याचे मला चांगले स्मरते. तिचा अपमान द्वारकेचा अधिपती दामोदर सुद्धा सहन करणार नाही कारण तो तिला भगिनी मानतो. त्यामुळें माझी चिंता वाढलेली आहे. ते सगळे पांडव, त्यांचा मामेभाऊ कृष्ण, प्रिशत व त्याचा मुलगा जो द्रोणाचा वध करण्यासाठी अवतरला आहे, त्याशिवाय इतर राजे जे पांडवांशी प्रामाणिक आहेत ज्यांची संख्या अफाट आहे ते सगळे युद्धाला उभे होणार. त्यांच्यापुढे माझ्या लेकरांचे कांहींच चालणार नाही. तेथे शकुनीच्या डावपेचांचे कांही उरणार नाही. माझा विश्वासातला प्रधान कणिक सुद्धा आम्हाला वाचवू शकणार नाही. हे लक्षात आले आहे माझ्या. त्यातून माझ्या मूर्ख मुलांना वाचवण्यासाठी शांततेचाच मार्ग अवलंबावा लागेल असें दिसते. कारण, कोणत्याही परिस्थितीत पांडव कौरवांपेक्षा कितीतरी पटीने जास्त प्रबळ आहेत. मला आठवते, भिमाने मुष्टीयुद्धात कसे त्या जरासंधाला ठार मारले व त्याच्या शरीराचे दोन तुकडे केले होते. अशा पांडवांशी दोन हात करणे म्हणजे साक्षात यमाला आव्हान देण्यासारखा अक्कलशून्यपणा ठरतो. त्यांच्यात एक कमजोर कडी आहे ती म्हणजे युधिष्ठीर त्याचा क्षमाशिलपणा वापरून पुन्हा पुन्हा कौरव त्याच्या आगळीकी सतत चालवू शकतात पण तो मार्गसुद्धा आता राहिला नाही कारण, ते आता वनवासात गेले आहेत. ते आले चौदा वर्षानंतर कीं त्याचे त्यांना देऊन टाकावे व सलोखा करावा हांच एक मार्ग शक्य आहे. असें विदूर मला त्यावेळी आमच्या हिताचा सल्ला देत होता, अरे गवाळगन (गुराखी) संजया". धृतराष्ट्र बोलून थांबतो.

पुढे तो स्वगत बोलतो, "परंतु, मी माझ्या मुलांचेच ऐकत राहिलो जे आम्हा सगळ्यांच्या नाशाचे कारण ठरणार आहे. असें कां होते कीं, आयत्या वेळी माझी बुद्धी भ्रष्ट होते व मी मुलाच्या बोलण्यात येऊन पुनः पुन्हा चुकीचे निर्णय घेत आहे"? अशारितीने सभापर्वातील अनुद्युत पर्वाचा एक्याऐंशीवा भाग संपला.

# - महाभारतातील सभा पर्व संपले -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल देत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत

नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें मालक, शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला, १९९२ फेब्रुवारी. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विचारांमुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर तो ब्लॉग बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा

ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ २०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही

कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मागवा. किंवा 7710980841हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद